R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८२

दि.११ मार्च २०२६,वारः बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## लातूर जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद; एकाच छताखाली नागरिकांना मिळाला महसुली सेवांचा लाभ

लातूर : राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान (टप्पा-१) ला लातूर जिल्ह्यात उत्साहात सुरुवात झाली आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व १० तालुक्यांमध्ये प्रत्येकी एका महसूल मंडळात समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमुळे एकाच दिवशी नागरिकांना विविध प्रमाणपत्रे, दाखले आणि डिजिटल सातबारा उतारे वाटप करण्यात आले.




ग्रामीण भागातील शेतकरी, सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि महिलांच्या महसूल विभागाशी निगडित प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. मार्च ते मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन केले जात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान सुरू आहे. एकाच ठिकाणी नागरिकांना आवश्यक महसुली सेवा उपलब्ध करून देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

शिबिरांमध्ये उपलब्ध होणाऱ्या प्रमुख सेवांमध्ये सातबारा अभिलेखातील चुका दुरुस्त करणे, डिजिटल सातबारा व आठ-अ उतारे तात्काळ पुरवणे, दीर्घकाळ प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, उत्पन्न, रहिवासी, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र आदी दाखल्यांचे वाटप, अकृषिक (एनए) जमिनीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची अट रद्द करणे व एकवेळचे अधिमूल्य भरण्याबाबत जनजागृती, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पी.एम. किसान योजना, भूसंपादन प्रकरणातील नोंदी अद्ययावत करणे आदी सेवा समाविष्ट आहेत.

एकाच दिवशी ३,५५७ हून अधिक डिजिटल सातबारांचे वाटप-या अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यात एकाच दिवशी एकूण ३,५५७ डिजिटल सातबारा आणि २,९२७ आठ-अ उतारे वाटप करण्यात आले. तसेच विविध प्रकारची ५,७९४ प्रमाणपत्रे नागरिकांना सुपूर्द करण्यात आली. देवणी तालुक्याने सर्वाधिक ७२० डिजिटल सातबारा वाटप केले, तर औसा तालुक्यात 'एक खिडकी' योजनेअंतर्गत सर्वाधिक ४६७ अर्जांचा निपटारा झाला. रेणापूर तालुक्यात भूसंपादनाशी संबंधित २९० प्रकरणांचे निराकरण करण्यात आले. या अभियानामुळे नागरिकांना एकाच छताखाली अनेक सेवा मिळाल्याने त्यांची धावपळ मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या या पुढाकारामुळे प्रलंबित फेरफार आणि त्रुटींचे निराकरण जागेवरच होत असल्याने शेतकरी आणि सामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.




समाधान शिबिरांना सहकार मंत्री व लोकप्रतिनिधींची उपस्थिती-छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत अहमदपूर तालुक्यातील किनगाव आणि चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथील समाधान शिबिरांना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची उपस्थिती लाभली. तसेच औसा तालुक्यातील किनीथोट येथील शिबिराला आमदार अभिमन्यू पवार, तर लातूर तालुक्यातील टाकळी शि. येथील शिबिराला छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयातील अपर विभागीय आयुक्त अनंत गव्हाणे यांची उपस्थिती होती. अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

समाधान शिबिरांमधील ठळक आकडेवारी-

निकाली काढलेले फेरफार प्रकरणे : ७१२

डिजिटल सातबारा वाटप : ३,५५७

आठ-अ उताऱ्यांचे वाटप : २,९२७

वाटप केलेली प्रमाणपत्रे : ५,७९४

एक खिडकी योजनेअंतर्गत निकाली अर्ज : १,७३९

## निकोप स्पर्धेच्या माध्यमातूनच विश्वशांती

### राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड



लातूर - जगामध्ये संपूर्ण जीव सृष्टीला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवेल अशी भयंकर युद्ध स्थिती निर्माण झाली आहे. आज गरज आहे ती परस्परांबद्दल जिव्हाळा, आत्मियता, प्रेम, संघ भावनेची आणि हे केवळ खेळाच्या भावनेतूनच शक्य होऊ शकते. युद्धाच्या जागी खेळ आणि विनाशाच्या जागी विकास हा संदेशच कुस्तीच्या माध्यामातून दिला जाईल. हे मैदान जागतिक शांततेचा एक आखाडा आहे. येथे स्वराज्य आणि स्वराष्ट्राच्या मातीतील कुस्तीचा विजयी नाद घुमणार आहे असे विचार विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) च्या पवित्र यज्ञ भूमीवर विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात अभूतपूर्व राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलते होते.

यावेळी हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, बंडातात्या पाटिल, बापूसाहेब मोरे, विष्णू जोशीलकर, रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, काशीराम दा. कराड, आमदार रमेशअप्पा कराड, डॉ. हनुमंत कराड, श्री. राजेश कराड, ऋषिकेश कराड, प्रा. तेजस कराड, श्री. बाळासाहेब बडवे, श्री. सरकार निंबाळकर, डॉ. एस. एन. पठाण, डॉ. रत्नदीप जोशी, डॉ. महेश थोरवे व प्रा. विलास कथुरे उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मऊ मेणाहूनि आम्ही विष्णूदास कठीण वज्रास भेदू ऐसे अशी परंपरा असलेल्या या गावात जागतिक स्तरावरील पैलवान येत आहेत ही अभिमानास्पद बाब आहे. खेळ परंपरेचा असून लोकांना जोडणारा, भावी जीवनाला दिशा देणारा आहे. ही स्पर्धा १९ वर्षापासून सुरू आहे.

दिनानाथ सिंग म्हणाले, आधुनिक काळातही लाल मातीवर प्रेम करणारे डॉ. विश्वनाथ कराड हे खऱ्या अर्थाने कुस्ती जगविण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. डॉ. कराड हे पुनम का चाँद आहे. त्यांनी पैलवानांना जो आधार दिला त्यातून त्यांचे खेळाप्रती प्रेम दिसून येते. ही स्पर्धा सतत अशीच चालत राहावी यासाठी पुढची पिढी तयार आहे.

ह.भ.प. बापूसाहेब मोरे म्हणाले, जीवनातील प्रत्येक गोष्टीतून आनंद घ्यावा हे डॉ. कराड यांच्याकडून शिकले पाहिजे. प्रत्येकाच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हे व्यासपीठ उभे केले आहे.

बाळासाहेब बडवे म्हणाले, महाराष्ट्राच्या कुस्तीचे हे वैभव अजरामर रहाण्यासाठी डॉ. विश्वनाथ कराड यांनी अद्वितीय कार्य केले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले २५० पैलवान लाल मातीत उतरणार आहेत. उद्घाटनाची कुस्ती रामेश्वर येथील प्रसाद शिंदे व कोल्हापूर येथील प्रणव राख यांच्यात झाली.

कुस्ती स्पर्धेचे धावते वर्णन समालोचन बाबा निम्हण यांनी केले. प्रा. विलास कथुरे यांनी प्रास्ताविकेत कुस्ती संदर्भातील माहिती दिली व आभार मानले.

## कोरोनाची लागण होऊन मृत्यू झालेल्या पोलीस अमलदारांच्या कुटुंबियांना ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान.

लातूर :- कोरोना महामारीच्या अत्यंत कठीण व अभूतपूर्व परिस्थितीत संपूर्ण देशासह लातूर जिल्ह्यात देखील पोलीस दलाने नागरिकांच्या सुरक्षेसाठी व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहोरात्र कर्तव्य बजावले. कोरोना संसर्गाचा धोका मोठ्या प्रमाणावर असतानाही पोलीस अधिकारी व अंमलदारांनी कोणतीही भीती न बाळगता रस्त्यावर उतरून नागरिकांचे संरक्षण, लॉकडाऊनची प्रभावी अंमलबजावणी, जमावबंदीचे पालन तसेच अत्यावश्यक सेवांचा सुरळीत पुरवठा होण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडली.




या कालावधीत नागरिकांच्या सेवेसाठी कर्तव्य बजावत असताना लातूर पोलीस दलातील पोलीस अमलदार राजकुमार शिवाजी लोखंडे यांना कोरोनाची लागण होऊन दिनांक २१/११/२०२० रोजी त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. आपल्या कर्तव्यनिष्ठा, समर्पण व समाजसेवेच्या भावनेतून त्यांनी दिलेले हे बलिदान पोलीस दलासाठी तसेच समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी असून त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहणारे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार कर्तव्यावर असताना कोरोनाची लागण होऊन मृत्यू झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने आज रोजी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या हस्ते संबंधित मयत पोलीस अमलदारांच्या कुटुंबियांना ५० लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश प्रदान करण्यात आला.

यावेळी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी कोरोना महामारीच्या काळात जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावत असताना प्राणांची आहुती देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्यामार्फत पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मयत पोलीस अमलदारांच्या संदर्भातील सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करून त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक यांनी यावेळी व्यक्त केले की, अशा कठीण प्रसंगी पोलीस विभाग संबंधित कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. शासनाकडून मिळालेल्या या आर्थिक मदतीमुळे कुटुंबियांना काही प्रमाणात दिलासा मिळेल तसेच त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक आधार मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लातूर पोलीस दल आपल्या कर्तव्यनिष्ठ सहकाऱ्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी सदैव उभे आहे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## संपादकीय...

# प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न आणि आमदार अभिमन्यू पवार यांची ठाम भूमिका

महाराष्ट्राच्या विकासाचा पाया हा शिक्षणावर उभा आहे. विशेषतः प्राथमिक शिक्षण हे संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचे मूलभूत आधारस्तंभ मानले जाते. मात्र गेल्या काही वर्षांत राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या स्थितीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. याच पार्श्वभूमीवर औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी विधिमंडळात प्राथमिक शिक्षणाचा मुद्दा आक्रमकपणे मांडत शिक्षणमंत्र्यांना धारेवर धरले.

विधिमंडळातील चर्चेदरम्यान आमदार पवार यांनी राज्यातील प्राथमिक शाळांची वास्तविक परिस्थिती सभागृहासमोर मांडली. ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, अपुरी पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साधनसामग्रीचा अभाव असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे राज्याच्या भविष्यासोबत खेळ करण्यासारखे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत असला तरच पुढील शिक्षणाची वाट सुकर होते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाला सरकारने सर्वाधिक प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

पवार यांनी शिक्षणमंत्र्यांना थेट प्रश्न विचारत राज्याच्या शिक्षण बजेटमध्ये प्राथमिक शिक्षणासाठी नेमका किती निधी राखीव ठेवला आहे, याबाबत स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी केली. केवळ योजना जाहीर करून चालणार नाही, तर त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

त्यांनी विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील शाळांची स्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगितले. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नाहीत, वर्गखोल्या अपुऱ्या आहेत आणि डिजिटल शिक्षणाची साधनेही उपलब्ध नाहीत, अशी परिस्थिती असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.राज्य सरकारने प्राथमिक शिक्षणासाठी दीर्घकालीन धोरण तयार करण्याची गरज असल्याचेही पवार यांनी अधोरेखित केले. फक्त वार्षिक घोषणा न करता ठोस आणि परिणामकारक धोरण आखणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले.

शिक्षकांची रिक्त पदे भरली गेली पाहिजेत, शाळांची दुरुस्ती आणि नव्या इमारतींसाठी निधी दिला पाहिजे तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणसुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, अशी ठोस मागणी त्यांनी केली.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेत गुंतवणूक करणे म्हणजे राज्याच्या भविष्यात गुंतवणूक करण्यासारखे आहे. हा मूलभूत विचार शासनाने स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पवार यांनी शिक्षणमंत्र्यांना उद्देशून सांगितले की, राज्याच्या विकासासाठी उद्योग, पायाभूत सुविधा आणि शेती महत्त्वाची असली तरी शिक्षणाशिवाय कोणताही विकास टिकाऊ ठरू शकत नाही.

आज अनेक पालक आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी संघर्ष करत आहेत. ग्रामीण भागातील कुटुंबांसाठी सरकारी शाळाच शिक्षणाचा मुख्य आधार आहेत. त्यामुळे या शाळांची गुणवत्ता वाढवणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

विधिमंडळात मांडलेले पवार यांचे मुद्दे केवळ राजकीय भूमिका नसून शिक्षणव्यवस्थेतील वास्तव अधोरेखित करणारे आहेत. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा विषय असल्याने सरकारने त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

प्राथमिक शिक्षण मजबूत असेल तरच राज्याचे भवितव्य उज्ज्वल राहील. त्यामुळे शिक्षणाच्या या मूलभूत स्तरावर अधिक निधी, चांगले नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांनी विधिमंडळात उपस्थित केलेले प्रश्न आणि मांडलेले मुद्दे सरकारसाठी एक प्रकारचा इशाराच आहेत. आता सरकारने या विषयावर ठोस पावले उचलून प्राथमिक शिक्षणाला खऱ्या अर्थाने प्राधान्य देणे अपेक्षित आहे

## शिवभोजन योजनेसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही-ंत्री छगन भुजबळ

मुंबई: राज्यातील गरीब आणि गरजू जनतेला सवलतीच्या दरात सकस भोजन उपलब्ध करून देणारी 'शिवभोजन योजना' अधिक सक्षमपणे राबवण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे अन्न,नागरी,पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. आमदार सना मलिक यांनी विधानसभेत याविषयाची लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

अन्न नागरी पुरवठा मंत्री भुजबळ म्हणाले की, सध्या संपूर्ण राज्यात १८७३ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सुधारित अंदाजपत्रकानुसार छ२२०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी देखील छ१२० कोटींची भरीव तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. हा निधी प्राप्त होताचा मार्चनंतर निधी वितरीत करणार आहे. शिवभोजन योजनेच्या देयकांचे वितरण उप नियंत्रक शिधावाटप, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या स्तरावर नियमितपणे केले जाते. क्षेत्रीय यंत्रणेला निधी वितरणासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून, लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ निरंतर मिळत राहील याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या प्रश्नाच्या चर्चेत विधानसभा सदस्य अनंत (बाळा) नर यांनी सहभाग घेतला.

# सक्षम महिला - सशक्त महाराष्ट्र : महिला व बालविकास विभागाच्या कल्याणकारी योजना

भारतीय महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरण हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असून, महिला व बालविकास विभागामार्फत मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मनोधैर्य योजना तसेच आदिशक्ती अभियान अशा विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. या योजनांचे अधिक बळकटीकरण करून सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालविकास विभागामार्फत सातत्याने विविध उपक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत. भविष्यातही महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि सुरक्षा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक आणि आश्वासह आराखडा तयार करण्यात आला असून, विभागामार्फत त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच सादर केलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भरीव आर्थिक तरतूदीची घोषणा केली आहे. राज्यभरातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांच्या कल्याणासाठी योग्य आणि प्रभावी धोरण राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ग्रामीण जिवनोन्नती अभियानांतर्गत आतापर्यंत सुमारे ३७ लाख महिला 'लखपती दीदी' बनल्या असून, आणखी २५ लाख लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. याशिवाय महिला बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची आणि स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. या उपक्रमांमुळे महिला स्वयंसहायता गटांना व्यवसायवृद्धीची संधी मिळून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण□राज्यातील महिलांचे आरोग्य पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येत आहे. आत्तापर्यंत दोन कोटी ३७ लाख पेक्षा जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

लेक लाडकी योजना-मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, त्यांचे शिक्षण वाढवणे आणि त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक आधार देणे हा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत पात्र मुलीला जन्मापासून १८ वर्षांपर्यंत टप्प्याटप्प्याने एकूण सुमारे १ लाख १ हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते.

शासकीय महिला वसतिगृहे / आधारगृह-१६ ते ६० वर्ष वयापर्यंतच्या निराधार, निराश्रित परित्यक्ता, कुमारीमाता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेलया महिलांना आश्रय संरक्षण व मुलभूत सुविधा परुवून त्यांचे नोकरी, व्यवसाय आणि विवाह याद्वारे पुनर्वसन करण्यात येते. पात्र महिलेस एक हजार, पहिल्या बालकास रूपये ५०० रूपये, दुसऱ्या बालकास ४०० रूपये अनुदान प्रदान करण्यात येते.

संरक्षणगृह-अनैतिक व्यापार कायद्याअंतर्गत पोलीसांमार्फत कुंटखान्यातून सोडविलेल्या पिडीतेस संरक्षणगृहात ठेवण्यात येते. राज्यातील २० शासकीय महिला राज्यगृहांना संरक्षण गृहे म्हणून घोषित करण्यात आले.

बालगृहातील निराश्रित मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्यशासकीय व स्वयंसेवी संस्थांची आधारगृहे, महिला वसतीगृहे या संस्थांमधील अनाथ मुलीच्या विवाहासाठी २५ हजार अनुदान दिले जाते. १५ हजार रूपये मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत पाच वर्षाकरिता योजनेत गुंतविण्यात येतात. तसेच १० हजार रकमेची संसारोपयोगी साहित्य संस्थेमार्फत खरेदी करण्यात येतात.

देवदासीकरीता कल्याणकारी योजना (श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना)-४० वर्षावरील प्रमाणीत देवदासीना उदर निर्वाहाकरीता दरमहा ६०० इतके निर्वाह अनुदान देण्यात येतात. देवदासीच्या पदवीधर मुलीच्या विवाहासाठी ५० हजार आणि पदवी नसल्यास २५ हजार अनुदान देण्यात येते. देवदासीच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी वर्षातून एकदा मुलासाठी १६०० तर मुलीसाठी १७५० एवढे दरडोई अनुदान देण्यात येते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार-महिला व बालकल्याण क्षेत्रात तसेच आर्थिक, सामाजिक, उन्नतीसाठी, शिक्षण, पुनर्वसन, अंधश्रद्धा निमूर्लन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या महिला व संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येते.

महिला व बालकल्याण समिती जिल्हा परिषद समिती मार्फत महिला व बाल विकासाची विविध कामे करण्यासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान देण्यात येते.

महिला समुपदेशन केंद्र योजना-महिलांवर होणाऱ्या अत्याचारास आळा बसावा यासाठी पोलीस स्टेशनच्या आवारात सुरू करण्यात आली आहे. राज्यात १२६ समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत.शुभमंगल सामुहिक विवाह योजनायोजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या मुलीच्या विवाहासाठी प्रति जोडपे १० हजार एवढे अनुदान वधुच्या कुटूंबियांच्या नावे देण्यात येतात.

मनोधैर्य योजना-बलात्कार/पोस्को कायद्याअंतर्गत १८ वर्षाखालील बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ऍसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना तीन लाख ते रूपये १० लाखापर्यंत अर्थसहाय तसेच विविध सेवा पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्यात येते.

१८१ टोल फ्री महिला हेल्प लाईन-हेलपलाईन नियंत्रण कक्षामध्ये ज्या जिल्ह्यांची तक्रार असेल, त्या संबंधित जिल्ह्यातीलवन स्टॉप सेंटरला ऑनलाईन पद्धतीने सदरील तक्रार पाठविली जाते. २०२३-२४ मध्ये २०३९ महिलांना आणि सन २०२४-२५ मध्ये माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत २२३० महिलांना सहाय्य प्रदान करण्यात आले.

नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह-ज्या महिलांचे मासिक उत्पन्न शहरांत ५० हजार आणि इतर ठिकाणी ३५ हजार पेक्षा जास्त नाही अशा नोकरी करणाऱ्या महिलांना वसतीगृहात प्रवेश देण्यात येतो. ७४ वसतिगृह कार्यरत आहेत. नोकरी करणाऱ्या एकल महिलांसाठी नव्याने ५० वसतीगृहे सुरू करण्यात येणार आहे.

**वन स्टॉप सेंटर**

# महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचा परिचय

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा हे त्रिपुराच्या माणिक्य राजघराण्यातून आलेले एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व आहेत. माणिक्य राजघराणे हे भारतातील सर्वात प्राचीन राजघराण्यांपैकी एक असून ते प्रगत विचारसरणीसाठी ओळखले जाते. या राजघराण्याने १९४१ मध्ये त्रिपुरासाठी पहिली लिखित राज्यघटना लागू केली होती. नागरिकांमध्ये स्वावलंबन, सहकार्य आणि राज्यनिष्ठा यासारख्या मूल्यांना प्रोत्साहन देणे हे राज्यघटनेचे उद्देश होते. या राज्यघटनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अल्पसंख्याक, मागासवर्गीय आणि कामगारांसाठी विधानसभेत जागांचे आरक्षण देण्यात आले होते. देशभरात आरक्षणाची संकल्पना रुजण्यापूर्वीच त्रिपुराच्या प्रगती आणि समृद्धीसाठी आधुनिक विचारांचा अवलंब करण्यात आला होता.



राजघराण्याची पार्श्वभूमी असूनही जिष्णु देव वर्मा अत्यंत विनम्र, सहज उपलब्ध आणि सर्व स्तरांतील लोकांशी संवाद साधण्यास उत्सुक असलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी १९९३ मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश करून आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात केली आणि त्रिपुराचे राष्ट्रीय परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यांनी त्रिपुरा प्रदेश भाजपचे सरचिटणीस म्हणूनही कार्य केले आणि पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाची जबाबदारी सांभाळली.

२०१८ मध्ये त्यांनी १९ चारिलाम (अनुसूचित जमाती) विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि तब्बल ८९.३३ टक्के मते मिळवत अभूतपूर्व विजय मिळवला.

२०१८ मध्ये त्रिपुरात२५ वर्षांच्या डाव्या आघाडीच्या कारकिर्दीनंतर भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत आले आणि जिष्णु देव वर्मा यांनी उपमुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. या काळात त्यांनी वित्त, ग्रामीण विकास आणि ऊर्जा यांसारख्या महत्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळली.

आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी विविध प्रकल्पांची अंमलबजावणी, आर्थिक संसाधनांची उपलब्धता आणि ठरलेल्या वेळेत कामे पूर्ण करण्यावर विशेष भर दिला.

त्रिपुरामध्ये यशस्वीपणे राबविण्यात आलेला बायो व्हिलेज २.० हा त्यांचा एक अभिनव उपक्रम आहे. कृषी, ऊर्जा आणि उपजीविकेच्या क्षेत्रात पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करून ग्रामीण भागात शाश्वत विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

समुदायाच्या सक्रिय सहभागावर आधारित या उपक्रमामुळे स्थानिक शेतकरी आणि कुटुंबांनी हरित तंत्रज्ञान व शाश्वत पद्धती स्वीकारल्या. त्यामुळे शाश्वत ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात त्रिपुराने अग्रस्थान मिळवले. पुढे या उपक्रमाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही उत्कृष्ट उपक्रम म्हणून मान्यता मिळाली.

ईशान्य भारताच्या विकासासाठी धोरण निर्मितीमध्ये जिष्णु देव वर्मा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १९८९ ते १९९३ या काळात ते नॉर्थ ईस्टर्न कौन्सिलच्या सल्लागार समितीचे प्रमुख सदस्य होते. त्यांनी इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेजच्या त्रिपुरा विभागाचे संयोजक म्हणून कार्य केले आणि ईशान्य भारतातील उपक्रमांचे समन्वयक म्हणून केले.

अनेक कलागुणांनी संपन्न असलेले जिष्णु देव वर्मा यांना आधुनिक कला, चित्रकला आणि शिल्पकलेची विशेष आवड आहे. त्यांच्या सर्जनशील कलाकृतींमध्ये विविध कलागुणांची अभिव्यक्ती दिसून येते. संस्कार भारतीच्या सहकार्याने त्यांच्या अनेक कलाकृती विविध पर्यटनस्थळे, मंदिरे आणि सार्वजनिक ठिकाणी मांडण्यात आल्या आहेत.

ते एक प्रख्यात कवी आणि लेखकही आहेत. बंगाली आणि इंग्रजी भाषेतील त्यांच्या कवितांनी अनेकांच्या मनाला स्पर्श केला आहे. त्यांच्या उहळश्रवीशप ेष थरींशी त्रेव्रवर्शीी आणि चरींशी ेष ढळाश या पुस्तकांमधील साहित्यिक अभिव्यक्ती प्रभावी आणि भावस्पर्शी मानली जाते.

त्यांच्या मते जीवन हा एक गहन प्रवास आहेज्यात प्रत्येक क्षण हा एक पवित्र आहुती आहे आणि प्रत्येक आव्हान हे ज्ञान व धैर्य वाढविण्याची संधी आहे. त्यांच्या कवितेतील शब्दांत ते असे म्हणतात

Let us carry hope in our souls,
Not only for ourselves,
But for those too,
Who look upon us with hope.

आदिवासी विकास, शिक्षण, आरोग्य तसेच कला आणि संस्कृती यांप्रती त्यांची अत्यंत निष्ठा आणि बांधिलकी आहे.

३१ जुलै २०२४ रोजी जिष्णु देव वर्मा यांची तेलंगणाचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर १० मार्च २०२६ रोजी त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतली.

आपल्या स्नेहपूर्ण स्वभावामुळे ते सर्व स्तरांतील लोकांशी सहजतेने संवाद साधतात आणि सामान्य नागरिकांसाठी नेहमी उपलब्ध असतात.

समाजातील उपेक्षित व वंचित घटकांना आधार देऊन त्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे यातच जीवनाचे सार्थक आहे असे ते मानतात.

# शेतकऱ्यांना वैज्ञानिक मार्गदर्शन मिळावे यासाठी पुढाकार घेवून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्यामार्फत पंतप्रधानांना निवेदन

लातूर : शेतकऱ्यांना आधुनिक व वैज्ञानिक शेतीचे मार्गदर्शन मिळावे तसेच शेती उत्पादनात वाढ व्हावी, या उद्देशाने लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय नागनाथ राजुळे यांनी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठवले आहे.



निवेदनामध्ये प्रत्येक गाव पातळीवर, गाव समूह पातळीवर, मंडळ पातळीवर आणि तालुका पातळीवर 'ग्री क्लिनिक' अथवा कृषी सल्ला केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या अनेक शेतकऱ्यांना मातीची गुणवत्ता, खतांचा योग्य वापर, पिकांवरील रोग-कीड नियंत्रण तसेच औषधांची अचूक मात्रा याबाबत वैज्ञानिक माहिती वेळेवर मिळत नसल्यामुळे शेती उत्पादनावर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शासनाने बी.एससी. ग्रीकल्चर, कृषी डिप्लोमा किंवा कृषी शिक्षण घेतलेल्या युवकांना 'ग्री क्लिनिक' सुरू करण्यास परवानगी द्यावी, अशीही मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. या केंद्रांद्वारे माती परीक्षण, योग्य खतांची शिफारस, रोग-कीड नियंत्रण, औषधांचा अचूक वापर तसेच उत्पादन वाढीसाठी वैज्ञानिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना देता येईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

या संदर्भात पंतप्रधानांसोबतच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , राज्याचे उपमुख्यमंत्री, भारत सरकारचे कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तसेच लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनाही निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी संपादक दत्तात्रय परळकर आणि वीरभद्र बाबुराव गोगे उपस्थित होते.


# संभाजी महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा

मुरुड / महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. तसेच १० मार्च सावित्रीबाई फुले यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. संभाजी महाविद्यालयातील आयक्युएसी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांची उपस्थिती होती. मंचावर महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु. गौरी पटाडे, कु. शिवानी आवटे, कु. त्रिशा जाधव, कु. प्रिती कांबळे यांचीही उपस्थिती होती. यावेळी बोलताना कु. गौरी पटाडे यांनी स्त्रीविषयक असणारे विविध हक्क आणि अधिकार सांगितले. तसेच स्त्रियांचे योगदान हे सर्व क्षेत्रांमध्ये आहे. स्त्रियांच्या योगदानामुळेच आपला भारत देश महान ठरला आहे असे देखील ते बोलताना म्हणाल्या. कु. शिवानी आवटे यांनी स्त्री आणि पुरुष समान असून त्यांना समानतेची वागणूक समाजात मिळाली पाहिजे. कारण जोपर्यंत स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणार नाही तोपर्यंत आपली प्रगती होणे शक्य नाही असे ते यावेळी म्हणाल्या. कु. त्रिशा जाधव यांनी स्त्रियांच्या जीवन जाणीव व्यक्त करणाऱ्या विविध कविता सादर करून स्त्रीयांच्या प्रश्नांना वाट मोकळी करून दिली. कु. प्रीति कांबळे यांनी देखील स्त्रियांना मानाचे आणि सन्मानाचे जिने सद्यस्थितीत मिळणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम म्हणाले की, शिक्षण, आरोग्य, राजकारण, विज्ञान, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात महिलांनी मोठे योगदान दिले आहे. या दिवशी महिलांच्या अधिकारांबद्दल चर्चा, कार्यक्रम आणि विविध उपक्रम आयोजित करून स्त्री-पुरुष समानता, महिला सशक्तीकरण आणि महिलांच्या सुरक्षिततेचा संदेश या दिवशी दिला जातो. समाजाच्या प्रगतीसाठी महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे त्यांचा आदर आणि सन्मान करणे आवश्यक आहे. यावेळी प्रा. मधुकर क्षीरसागर यांनी महिलांच्या सन्मानाची, संरक्षणाची आणि समानतेची शपथ सर्वांना दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयक्युएसी समन्वयक प्रो डॉ. जी. एल. जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एम. बी. गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. मधुकर क्षीरसागर यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.




# डॉ,बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी बलभीमराव कोथिंबीरे यांची निवड,

लातूर- डॉ,बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी संस्था चालक तथा सेवानिवृत्त प्रा, बलभीमराव कोथिंबीरे डॉ,बाबासाहेब आंबेडकर पार्क कर्मचारी संघ लातूर ची बैठक वरील निवड करण्यात आली, बी, गायकवाड हे होते, जयंती निवडण्यात आली, अध्यक्ष उपाध्यक्ष प्रा, शंकर सोनवणे,



संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष यांची निवड करण्यात आली, येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त संपन्न झाली याच बैठकीत बैठकीच्या अध्यक्षस्थानी बी, कार्यकारिणी खालील प्रमाणे प्रा, बलभीमराव कोथिंबीरे, माणिकराव पवार, विनायक बोरीकर, मोहन कांबळे सेलूकर, प्रा,डॉ, बाळासाहेब झरीकर, सचिव प्रा, एस, टी, मस्के, सह सचिव प्रा, डी, टी, सूर्यवंशी, बी, बी, गायकवाड, प्रा, देविदास शिंदे, अंकुश रोडे, रमेश श्रृँगारे, संघटक प्रा, विजयकुमार श्रृँगारे, सह संघटक एस, एस, धसवाडीकर, ए, बी, कांबळे, रमेश हणमंते, डी, एन, कांबळे, कोषाध्यक्ष लक्ष्मण धोत्रे, सह कोषाध्यक्ष एम, एम, माकणीकर, देगलूरकर, प्रमुख सल्लागार प्रा, अनंत लांडगे, डॉ, सुधाकर गुळवे, पी, एस, कांबळे, इंजि, ए, आर, लामतुरे, एन, डी, गायकवाड, अभिमन्यू सवई, डी, एस, साठे, प्रा, एस, टी, मस्के यांनी आभार मानल्या नंतर बैठक संपली,

# महिलांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागानेच सशक्त महाराष्ट्र घडेल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





मुंबई : शिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाव्दारे राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होईल. आर्थिकदृट्या सक्षम महिलांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागानेच सशक्त महाराष्ट्र घडविता येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महिला व बालविकास विभागाच्यावतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'सक्षम महिला-सशक्त महाराष्ट्र' या विशेष कार्यक्रमात प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सक्षमपणे उभ्या राहिलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुरस्कारप्राप्त महिलांचे अभिनंदन करत त्या इतर महिलांसाठी प्रेरणा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त नयना गुंडे, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वि. रा. ठाकूर, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवाडे, उपायुक्त जमसिंग गिरासे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेत अनेक महिलांनी प्रगती साध्य केली आहे. अशाच प्रतिकुल परिस्थितीवर मात करत यशस्वी ठरलेल्या जळगाव येथील वैशाली हिवराळे, नाशिक येथील सेजल जडेजा, कुर्ला (मुंबई) येथील सरिता नाईक, परभणी येथील सुरेखा पवार, पुणे येथील

बागेश्वरी रेड्डी, रायगड जिल्ह्यात नोकरी करणाऱ्या बीड येथील ज्योती मीरगणे, मुंबईत नोकरी करणाऱ्या पुणे येथील सुवर्णा अग्रवाल, पूणे येथील मार्जेना दिलावर मणेर आणि मानसी पटेकर, तसेच किरण पांडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जीवनाचा मार्ग प्रशस्त करणाऱ्या या महिला समाजातील अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत. हा केवळ सत्कार नसून त्यांच्या जीवनाचा सन्मान सोहळा आहे. विविध



योजनांच्या माध्यमातून महिलांना रोजगार, शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य देण्याचे काम शासन करीत आहे. या प्रक्रियेतून महिला सक्षम बनणार असून, रोजगार, उद्योग आणि आर्थिक सक्षमीकरणातून महिलांचा राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत सहभाग वाढणार आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळणार असून, सशक्त राष्ट्र घडविण्याची ही प्रक्रिया आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विकसित भारत २०४७ लक्ष्य गाठायचे असल्यास महिलांचा अर्थव्यवस्थेत सहभाग असणे आवश्यक आहे, अशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भूमिका आहे. केंद्र सरकारने 'बेटी बचाव बेटी पढाव', 'लखपती दीदी' सारख्या अनेक योजना राबवून महिलांना प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध करून दिली आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ हे लक्ष्य गाठण्यासाठी राज्यातही महिलांना आर्थिक बळ देऊन त्यांचा मानव संसाधन म्हणून अर्थव्यवस्थेत सहभाग करून घेण्यासाठी शासन कृतिशील आहे. विकसित राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढविल्यामुळे अर्थव्यवस्था मजबूत झाली, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दोन वर्षांत राज्यात ३७ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्यात आले असून दरवर्षी एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवणाऱ्या महिलांची संख्या २०२६२७ मध्ये एक कोटीपर्यंत नेण्याचा शासनाचा मानस आहे. यामुळे अर्थचक्र परिवर्तीत होणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने हे वर्ष महिला शेतकरी वर्ष घोषित केल्याचा संदर्भ देत महिला शेतकरी, पशुपालक, कुक्कुटपालक आणि शेळीपालकांना सहाय करणाऱ्या योजना राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**शासन महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कटिबद्ध-उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, शासन महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे. महिलांचा सन्मान म्हणजे केवळ गौरवाचे शब्द नसून त्यांच्या भावना, अपेक्षा आणि स्वप्नांचा खरा आदर करणे होय. शेतीपासून विज्ञानापर्यंत विविध क्षेत्रांत महाराष्ट्रातील महिलांनी उल्लेखनीय कर्तृत्व गाजवले असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे निर्णयप्रक्रियेत महिलांना समान स्थान आणि स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य होय. असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या.

**एकल महिलांसाठी धोरण ठरविणारे महाराष्ट्र पहिले राज्य-महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे**

राज्यातील तसेच केंद्र शासनातील विविध योजनांचा लाभ एकल महिलांना मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. एकल महिलांसाठी धोरण ठरविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आर्थिकरित्या त्यांना सक्षम करून उद्योग व व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यात योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये मनोधैर्य योजना, वन स्टॉप सेंटर, सखी सेंटर आणि शक्ती सदन यासारख्या योजनांची व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचेही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी सांगितले.

# विधान भवन येथे बुधवारी ११ मार्च रोजी महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासंदर्भात विशेष चर्चासत्र - विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर

मुंबई : संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केलेले आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ आणि जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १०.०० वाजता महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासंदर्भात विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रसंगी उपस्थित रहावे असे निवेदन विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी केले.

तसेच या चर्चासत्राबाबत विधानपरिषदेत सभापती प्रा.राम शिंदे यांनी निवेदन केले.

संयुक्त राष्ट्र संघटनेने यंदाचे वर्ष हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले आहे. जागतिक अन्न व्यवस्थेत महिलांचे अमूल्य योगदान अधोरेखित करणे आणि शेतीमध्ये त्यांना समान संधी, संसाधने, जमीन अधिकार मिळवून देऊन सशक्त करणे, यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जाणे अभिप्रेत आहे. या पार्श्वभूमीवर या विशेष कार्यक्रमाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. सौम्या स्वामिनाथन आणि डॉ. नित्या राव यांचे महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासंदर्भात व्याख्यान होईल. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात शेतकरी महिलांना यांना सन्मानीत करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या समिती प्रमुख मोनिका राजळे, वि.स.स. डॉ.ज्योती गायकवाड, वि.स.स. मंजुळा गावित, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे उपस्थित असणार आहेत.

# लातूरमध्ये नाट्यप्रशिक्षण शिबीर तज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभणार

लातूर - महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालय द्वारा लातूरमध्ये नाट्य प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिबीर दिनांक १३ मार्च ते २६ मार्च २०२६ दरम्यान, टिळक भवन, टिळक नगर, अशोक हॉटेल येथे सकाळी १० ते सायं. ५ असे असणार असून या नाट्य शिबिराचे समन्वयक अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद लातूर महानगर शाखा असणार आहे.

सलग १० दिवस चालणाऱ्या या नाट्याशिबिरात प्रवेश विनामूल्य असून शिबीर वय वर्षे १५ पेक्षा अधिक असणाऱ्या इच्छुकांसाठी आहे. या शिबिरात लेखन, संहिता, दिगदर्शन, अभिनयाचे विविध पैलू, आवाज व उच्चार साधना यासह नेपथ्य, प्रकाश योजना, रंगभूषा, वेशभूषा आदी तांत्रिक बाजू ही शिकविल्या जाणार आहेत.

यासाठी महाराष्ट्रातील विविध तज्ञ प्रशिक्षक व मार्गदर्शक उपस्थित रहाणार आहेत. ज्यात चला हवा येऊ द्या फेम अंकुश वाढवे, यवतमाळ, नॅशनल स्कुल ऑफ ड्रामा, दिल्ली येथून पास झालेली नाट्य व सिने अभिनेत्री नुपूर चितळे, मुंबई, सिने व नाट्यअभिनेते अभय कुलकर्णी, मुंबई, सिने लेखक व अभिनेते डॉ. सुधीर निकम, बीड, आकाशवाणी समालोचक उमेश घळसासी, मुंबई, कृतार्थ कंसारा, नाशिक, डॉ. नाथा चितळे, नांदेड, लक्ष्मण वासमोडे, भारत थोरात, लातूर आदी मान्यवर तज्ञ प्रशिक्षक मार्गदर्शकांचा समावेश आहे.

नाट्यशिबिरात मर्यादित संख्या घेतली जाणार असून यासाठी ड. शैलेश गोजमगुंडे ८८५५९९३३९९, विजय मस्के ९९६०७०९७४१, रुपेश सूर्यवंशी ९९६०९५४६८७ आदींना संपर्क करावा.

या नाट्य शिबिराचा लातूर व परिसरातील कलाकारांनी अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, नाट्यपरिषदेचे ड. शैलेश गोजमगुंडे, डॉ. दीपक वेदपाठक, डॉ. मुकुंद भिसे, अनिल प्रा. अनिल कांबळे, विजय मस्के, रुपेश सूर्यवंशी, प्रमोद कांबळे, रणजित आचार्य आदींनी केले आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्यास १२ मार्चपर्यंत अंतिम मुदत

लातूर(जिमाका) : सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात शासकीय वसतिगृह तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी हींींि://हरी.ारहरळीं.ीस हे नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी या पोर्टलवर शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरलेला आहे. परंतु, वसतिगृह क्षमतेअभावी तसेच विद्यार्थ्यांच्या अडचणीमुळे वसतिगृहात प्रवेश घेवू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळविण्यासाठी त्यांचे अर्ज विद्यार्थी लॉगीनला महा-आयटीकडून परत पाठविण्यात आलेले आहेत.

तरी ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही तसेच ज्यांचे अर्ज विद्यार्थी लॉगीनला परत आले आहेत. त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरिता आवश्यक कागदपत्रे हींींि://हरी.ारहरळीं.ीस या पोर्टलवर १२ मार्च, २०२६ पुर्वी अपलोड करुन अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करावेत, व त्याची हार्डकॉपी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयातील स्वाधार शाखेस सादर करावेत, असे समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी आवाहन केले आहे.

# लातूरमध्ये १२ मार्च रोजी विद्यार्थी आक्रोश मोर्चा

लातूर : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूरच्या वतीने विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी १२ मार्च २०२६ रोजी विद्यार्थी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा सकाळी १० वाजता दयानंद गेट ते महात्मा गांधी चौक, लातूर या मार्गावर काढण्यात येणार असल्याची माहिती परिषदेकडून देण्यात आली.

या मोर्चामध्ये विद्यार्थ्यांच्या अनेक प्रलंबित मागण्यांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याने स्पर्धा परीक्षा शुल्क माफ करणे, तसेच ऑनलाइन परीक्षांसाठी घेतले जाणारे शुल्क कमी करणे, अशी प्रमुख मागणी करण्यात येणार आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण योजना प्रभावीपणे राबविणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथील प्रवेश, परीक्षा व निकाल प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करणे, तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती वेळेवर वितरित करणे या मागण्याही मोर्चातून मांडल्या जाणार आहेत.

महाविद्यालयीन विद्यार्थी संघ निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार पुन्हा सुरू कराव्यात, तसेच शासकीय वसतिगृहांचे नूतनीकरण करून विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

तसेच आयटीआयमध्ये उपकरणांचे नूतनीकरण, नर्सिंग अभ्यासक्रमातील ८०:२० पॅटर्न रद्द करणे, कृषी व अकृषी विद्यापीठांतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे, पशुवैद्यकीय शिक्षणातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व भत्ते वाढविणे यासह इतर शैक्षणिक प्रश्नांवरही परिषद मोर्चा काढणार आहे.

लातूर शहरात अलीकडील काळात वाढत असलेल्या शैक्षणिक परिसरातील गुन्हेगारीवर आळा घालावा अशी मागणीही यावेळी करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, लातूरच्या वतीने करण्यात आले आहे

# नारायणी प्ले स्कूलमध्ये 'भजन क्लब' उपक्रम उत्साहात संपन्न




लातूर : आजच्या आधुनिक आणि स्पर्धात्मक जगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांचे ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये चांगले संस्कार, सांस्कृतिक मूल्ये आणि आध्यात्मिक जाणीव निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. याच उद्देशाने दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी नारायणी प्ले स्कूल मध्ये भजन क्लब या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये झश्रर्ॅ त्र्रीी, छीीशी, ड्घत्र, णघत्र मधील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी हरिपाठ, संतांच्या अभंगांचे गायन, गणेश वंदना, सरस्वती वंदना तसेच गुरु वंदना सादर केली. काही विद्यार्थ्यांनी टाळ, वीणा आणि इतर वाद्यांच्या साथीने भजने सादर करून हा भजन क्लब कार्यक्रम अधिक रंगतदार केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख झाली. तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, एकाग्रता आणि टीमवर्कची भावना वाढण्यास मदत झाली. लहानग्या विद्यार्थ्यांनी अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला. शालेय शिक्षणाबरोबरच लहान मुलांमध्ये कलागुणांचा विकास व्हावा यासाठी या प्रकारचे कार्यक्रम या शाळेत नेहमीच राबविले जातात.

कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सुंदर सादरीकरणामुळे कार्यक्रम अत्यंत आनंददायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी शाळेच्या संचालिका व मुख्याध्यापिका सौ. शिवकन्या महेश पवार मॅडम शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यामुळे भविष्यातही अशा सांस्कृतिक आणि मूल्याधारित कार्यक्रमांचे नारायणी प्ले स्कूलमध्ये आयोजन करण्यात येणार आहे.

# जिष्णू देव वर्मा यांनी घेतली राज्यपालपदाची शपथ

मुंबई: महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्यपाल पदाची शपथ घेतली. लोकभवनातील दरबार सभागृह येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. जिष्णू देव वर्मा हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.

सुरुवातीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधी नंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.

शपथविधी सोहळ्याला विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, अन्न व औषध प्रशासन नरहरी झिरवळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, मुख्य राज्य शिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# रेणापूर पंसचे नूतन सभापती,उपसभापती यांचे,आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन





लातूर - रेणापूर तालुक्याचे सर्वांगीण विकासाचे हित लक्षात घेऊन पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती निवडीच्या अनुषंगाने भाजपा आणि मनसेची युती करण्यात आली असून नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत रेणापूर पंचायत समितीच्या एकूण आठ जागेपैकी भाजपाला तीन, मनसे दोन आणि काँग्रेसला तीन याप्रमाणे विजय प्राप्त झाला आहे. पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि मनसेचे नेते संतोष नागरगोजे यांच्यात चर्चा होवून रेणापूर तालुक्याच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून सर्वांगीण हित लक्षात घेऊन युती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

भाजपा मनसेच्या युतीनुसार रेणापूर पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता मनसेच्या सौ. मोनिका रवींद्र सूर्यवंशी यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली तर उपसभापती पदाकरिता भाजपाचे शरद दरेकर यांना पाच मते आणि काँग्रेसचे बालाजी घोडके यांना तीन मते मिळाल्याने भाजपाचे शरद दरेकर उपसभापती पदासाठी विजयी घोषित करण्यात आले.

सदरील निवड जाहीर होताच आ. कराड यांच्या भाजपा संवाद कार्यालयात नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मनसेचे नेते संतोष नागरगोजे, डॉ. नरसिंह भिकाने, शिवकुमार नागराळे, भागवत शिंदे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, अनिल भिसे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

शासनाच्या विविध योजना निश्चितपणे खेचून आणू मात्र कोणाचीही आडवणूक होणार नाही याची काळजी घेऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे वैभव जपण्याचे काम पंचायत समितीच्या माध्यमातून व्हावे आपल्या कामाचा विभागातच नव्हे तर राज्यात वेगळा ठसा निर्माण करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. भ्रष्टाचार मुक्त आणि स्वच्छ प्रशासन देऊन लोकांच्या अडीअडचणी निश्चितपणे सोडवणूक करून रेणापूरची पंचायत समिती आदर्श निर्माण करू अशी ग्वाही मनसेचे संतोष नागरगोजे यांनी दिली. नेत्यांच्या विश्वासाला पात्र राहून काम करू कुठेही तडा जाणार नाही असे नवनिर्वाचित सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांनी बोलून दाखविले. प्रारंभी आ. कराड आणि नागरगोजे यांचे नुतन पदाधिकारी यांनी सत्कार करुन आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दशरथ सरवदे यांनी आभार मानले.

यावेळी मनोज कराड, सुकेश भंडारे, विजय गंभीरे, बाळासाहेब मुंडे, विष्णू गोरे, ज्ञानोबा भिसे, वाहेद शेख, श्रीपाद बस्तापुरे, संतोष चव्हाण, राज जाधव, निवृत्ती लहाने, ओम चव्हाण, गोपाळ पडिले, धनंजय पवार, नवनाथ माने, महेश गाडे, लक्ष्मण खलंग्रे, अच्युत कातळे, लक्ष्मण यादव, विजय चव्हाण, साजिद पटेल, उत्तम चव्हाण, सुरेश बुड्डे, नंदकुमार वल्लमपल्ले, श्रीमंत नागरगोजे, अजित पाटील, जयप्रकाश जटाळ, प्रमोद आंबेकर, रवी सूर्यवंशी, माणिक शिरसाट, प्रकाश गालफाडे, नरसिंग भताने, शिवराज शिरसाट, बलभीम जाधव, भैय्या गाडे, प्रकाश जाधव यांच्यासह दोन्ही पक्षाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोशल मीडियावरील बदनामीला आळा घालण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई: सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांची होणारी बदनामी आणि सायबर छळवणुकीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रश्नउत्तरांच्या तासात सांगितले.

विधानसभा सदस्य प्रशांत ठाकूर यांनी राज्यातील सायबर सुरक्षेबाबत प्रश्न विचारला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६ (अ) सारख्या तरतुदीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने बदल केले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखून, सध्याच्या परिस्थितीत गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी कायद्यात बदल करण्यासंदर्भात अभ्यास करण्यात यईल. समाजातील सर्व स्तरांतील लोकांना सायबर गुन्ह्यांचा सामना करावा लागत असला, तरी महिलांना होणारा त्रास विशेषतः गंभीर आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी कायद्यात ठोस तरतुदी सुचवण्याचे निर्देश समितीला देण्यात येतील. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात क्रांतिज्योती सावित्रीबाईंना अभिवादन

लातूर : येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते सावित्रीमाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यापिका आणि महान समाजसुधारक होत्या. पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी १८४८ मध्ये पुण्यात भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. सेवा आणि करुणेचा त्या आदर्श आहेत. स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. आजच्या शिक्षकांनी फुले दाम्पत्याच्या विचारांचा अंगिकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.